# आधुनिक भारताचे शिल्पकार बाबासाहेब


प्रिय बहीण-भावांनो,

सर्व भारतीयांना न्याय मिळवून देण्यासाठी, नागरिक म्हणून समान अधिकार देणाऱ्या भारतीय संविधानाचे शिल्पकार **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 134व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!**

अन्यायाची रात्र संपवून न्यायाचा आणि समतेचा प्रकाश पसरवणारा सूर्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर!

संविधान निर्मीतीसोबतच आधुनिक भारत घडवण्यासाठीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत व्यापक आणि मोलाचे योगदान दिले आहे.

## भारताच्या विकासाच्या पायाभरणीत मोलाचे योगदान




- **आर्थिक धोरण: रिजर्व बँकेची** स्थापना, **बँका** व **LIC** सारख्या **विमा कंपन्या,** खाणी व पायाभूत **उद्योगांचे राष्ट्रीयीकरण** बाबासाहेबांच्या विचारांतूनच झाले.
- **जल धोरण: दामोदर, हिराकूड** अशा मोठ्या धरण प्रकल्पांना त्यांनी मार्गी लावले.
- **उर्जा धोरण:** वीज क्षेत्र सरकारीच असले पाहिजे, त्याचे खाजगीकरण नको - ही त्यांची भूमिका होती.
- बाबासाहेबांच्या उर्जाधोरणाप्रमाणे 1948 साली **'केंद्रीय विद्युत प्राधिकरण'** स्थापन झाले आणि पूर्ण देशाला वीज पुरवणाऱ्या **'राष्ट्रीय विद्युत ग्रिड'**चा पाया रचला गेला.

## बाबासाहेबांचे शैक्षणिक कार्य

- **"सरकारने शिक्षण मोफत व सक्तीचे करणे गरजेचे आहे"** - बाबासाहेबांच्या या भुमिकेमुळे 14 वर्षाखालील सर्वांना मोफत शिक्षणाची तरतूद केली गेली.
- **'गाव तिथे शाळा'** या धोरणानुसार गावोगावी सरकारी शाळा सुरू करण्यात आल्या.
- तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवण्यासाठी बाबासाहेबांनी **'पीपल्स एजुकेशन सोसायटीची'** स्थापना केली. आज या संस्थेची **30 पेक्षा जास्त महाविद्यालये** आहेत.

## बहुजन नायक बाबासाहेब

- शतकानुशतके भेदभाव व शोषणाचे बळी ठरलेले **एससी, एसटी, ओबीसी, एनटी आणि सर्व महिला** यांसाठी संविधानात आरक्षणाची तरतूद केली.
- **चवदार तळे सत्याग्रह** - पाण्यासाठी नव्हे तर **माणूस म्हणून जगण्याच्या अधिकारासाठी** होता.
- अस्पृश्यता कायद्याने गुन्हा ठरवला. धर्म, जात, लिंग, वर्ण, प्रांत यावरून होणाऱ्या **भेदभावाला बेकादेशीर ठरवले**.
- बाबासाहेबांच्या अथक प्रयत्नांतून **पहिल्या मागासवर्गीय आयोगाची स्थापना** झाली.




**चवदार तळे सत्याग्रह, महाड.**



**खोती प्रथेविरोधात आंदोलन**

## शेतकऱ्यांसाठी लढणारे बाबासाहेब

- शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या खोतीप्रथेविरोधात शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभे करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी **खोती प्रथा बंद पाडली.**
- बाबासाहेबांच्या भुमिकेनुसार स्वतंत्र भारताच्या पहिल्या सरकारने **जमीनदारी नष्ट** करून मोठ्या प्रमाणावर **शेतजमिनीचे वाटप** केले. **कुळ कायद्यानुसार "कसेल त्याची जमीन"** केली.
- सरकारने शेतकऱ्यांना **बी-बियाणे, खते, कर्ज, कृषी उत्पन्न बाजार समिती** उपलब्ध करायला पाहिजे, अशी बाबासाहेबांची भूमिका होती.

## महिला मुक्तीसाठी झटणारे बाबासाहेब

**"महिलांची प्रगती झाल्याशिवाय देशाची प्रगती होऊ शकत नाही"**, अशी बाबासाहेबांची ठाम भुमिका होती.

- बाबासाहेबांच्या प्रयत्नांमुळे महिलांना मिळालेले अधिकार -
  - **पगारी प्रसुतिरजेचा** अधिकार
  - कामाच्या ठिकाणी **पाळणाघरे**
  - समान कामाला **समान वेतन**
  - महिला **आरक्षण**
  - वारशाने **संपत्तीचा अधिकार**, घटस्फोटाचा, पोटगीचा आणि पुनर्विवाहाचा अधिकार

## कामगारांचे नेते बाबासाहेब

- **'स्वतंत्र मजूर पक्षा'**च्या माध्यमातून कष्टकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अनेक आंदोलने केली.
- **कामगार मंत्री** असताना कामगारांसाठी घेतलेले निर्णय:
  - **कामाचे तास 12 वरून 8** केले
  - **पगारी सुट्टी** दिली
  - कामगार संघटनेला मान्यता दिली
  - **महागाई भत्ता** दिला
  - अपघातग्रस्त कामगाराला **नुकसान भरपाईची** तरतूद केली

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान

आपल्या देशातील भक्ती परंपरेतील अनेक महान संतांची शिकवण आपल्या संविधानात आहे. **छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले** आणि **राजर्षी शाहू महाराज** यांनी ही मूल्ये समाजात रुजवली. याच विचारांतून प्रेरणा घेऊन बाबासाहेबांनी संविधान घडवले.



**बाबासाहेबांच्या आग्रहामुळे संविधानामध्ये मार्गदर्शक तत्वांचा समावेश** केला गेला. त्यानुसार:

- **गरीब-श्रीमंतांमधील दरी कमी करणे** सरकारची जबाबदारी आहे.
- लोकांना **चांगले शिक्षण, आरोग्य, पोषण, रोजगाराच्या संधी** देण्यासाठी पैसे नाहीत, असे कारण कोणत्याही सरकारने देऊ नये. **गोरगरीबांचे कल्याण करण्यासाठी सरकार बांधील असेल.**
- या देशाचे **सरकार हे धर्मनिरपेक्षच असावे** - सर्व धर्मांचे सरकारसमोर एकच स्थान असेल - ही बाबासाहेबांची ठाम भूमिका होती.

**चला, भीमप्रतिज्ञा घेऊया आणि भीमजयंती विचारांची जयंती म्हणून साजरी करूया!**




## भीमप्रतिज्ञा

**"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त मी अशी शपथ घेते/तो की, मी नेहमी बाबासाहेबांच्या विचारांवर चालेन, आणि कधीही जाती-धर्माच्या आधारे भेदभाव करणार नाही. मी महिलांचा आदर करेन. भारतीय संविधान सर्व जाती-धर्माच्या लोकांचे आहे, असे मी मानतो. संविधानाचा विचार मी जास्तीत-जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करेन. अशाप्रकारे विचारांची जयंती साजरी करणे, हेच माझे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन असेल.**
**जय भीम, जय संविधान!"**

**संविधान जागर अभियान**

निमंत्रक समिती: मा.न्या.बी.जी. कोळसे पाटील, प्रा.डॉ. सुखदेव थोरात, तुषार गांधी, उत्तम कांबळे, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन

स्वप्निल फुसे: 79723 45764 | नागार्जुन वाडेकर: 98602 39899 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739

samvidhanjagar.org